सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ११५ | गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## निवेदन

दै. 'ग्लोबल महातेज'ला समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह सर्वच वाचक, हितचिंतक, जाहिरातदार यांनी उत्स्फूर्तपणे स्वीकारले आहे. तोंड भरून कौतुकही केले आहे. त्याचप्रमाणे अंकाच्या किंमत वाढीसंदर्भातही सर्व वाचकांनी खुल्या दिलाने वारंवार आवाहन केले होते. त्यामुळे गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ पासून अंकाची किंमत ३ रुपये करीत आहोत. सर्वांचे सहकार्य लाभावे, ही विनंती.

- संपादक

## आजचे अभीष्टचिंतन





श्री. विजय बिऱ्हाडे
शिक्षक



श्री. हेमंत वैद्य
पुरोहित, अमळनेर



ॲड. शकील काझी
अमळनेर

## दिनविशेष

१५ जानेवारी

- जनरल गोपाल गुरुनाथ बेवूर यांनी भारताचे 9वे लष्करप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. लष्करप्रमुख होणारे ते पहिले महाराष्ट्रीयन आहेत.
- बोरीबंदर (व्हिक्टोरिया टर्मिनस), जे भारतातील रेल्वे युगाच्या सुरुवातीपासून ब्रिटिश परंपरा आणि संस्कृतीचे प्रतीक आहे, त्याचे छत्रपती शिवाजी टर्मिनस (CST) असे नामकरण करण्यात आले.
- गायिका ज्योत्स्ना भोळे यांना राज्य सरकारतर्फे गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- ESA च्या SMART-1 चांद्र परिभ्रमण यंत्राने कॅल्शियम, ॲल्युमिनियम, सिलिकॉन, लोह आणि चंद्रावरील इतर पृष्ठभागावरील घटक शोधले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**






अमळनेर : कोंडाजी युवक मंडळ संचलित कोंडाजी व्यायाम शाळा, पैलाड-अमळनेर यांच्यातर्फे दरवर्षीप्रमाणे मकर संक्रांतीनिमित्त बुधवारी दुपारी बोरी नदीच्या पात्रात विराट कुस्त्यांच्या खुल्या दंगलीचे आयोजन करण्यात आले. यात राज्यातील विविध ठिकाणच्या पुरुष व महिला पहिलवानांनी सहभाग नोंदविला. विजेत्या पहिलवानांचा ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी राजू पहिलवान, विठ्ठल पहिलवान, अशोक पहिलवान, संजू पहिलवान यांनी पंच म्हणून काम पाहिले. यासाठी मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर या संस्थेचे अनमोल सहकार्य लाभले. (छायाचित्रे : मयूर चौधरी)

# मुलीला शाळेत सोडण्यासाठी जाणाऱ्या पित्याच्या गळ्याला मांजाचा विळखा

## तांबेपुरातील नंदगाव रस्त्यावरील प्रकार; गंभीर जखम झाल्याने रुग्णालयात दाखल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : मुलीला शाळेत सोडायला जात असताना पतंगाच्या मांजाने तरुणाचा गळा कापला जाऊन तो गंभीर जखमी झाला. ही घटना बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी सकाळी येथील तांबेपुरा भागातील नंदगाव रस्त्यावर घडली.**

याबाबत माहिती अशी, की महेश भीमराव पाटील (वय ४६, रा. रंजाणे, ता. अमळनेर, जि. जळगाव) हे आपल्या मुलीला शाळेत सोडण्यासाठी येत होते. याचवेळी रस्त्यात उडत आलेल्या पतंगाच्या मांजाचा त्यांच्या गळ्याला विळखा पडल्याने गळा कापला गेला.

मात्र हा प्रकार त्यांना वेळीच जाणवला नाही. मुलीने जेव्हा त्यांना सांगितले, की तुमच्या गळ्यातून रक्त येत आहे त्यावेळी ही बाब त्यांच्या लक्षात आली.

याचवेळी तेथे रस्त्यांची साफसफाई करण्यासाठी कर्मचाऱ्यांसह हजर असलेले आरोग्य निरीक्षक संतोष माणिक यांनी हा प्रकार पाहिला. त्यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने नगरसेवक मुक्तार खाटीक यांना बोलावले. त्यानंतर पाटील यांच्या गळ्याला तात्पुरत्या स्वरूपात रुमाल बांधून त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. तेथे डॉ. आशिष पाटील यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले.

मात्र, जखम खोलवर व गंभीर असल्याने त्यांना तेथून खासगी रुग्णालयात पाठविण्यात आले. तेथे डॉ. संदीप जोशी यांनी त्यांच्यावर तातडीने उपचार केले. जखम खोलवर होती. मात्र वेळीच उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण बचावले. जर दुर्दैवाने श्वासनलिका कापली गेली असती, तर कदाचित त्यांना प्राणाला मुकावे लागले असते, असे डॉक्टरांकडून सांगण्यात आले.



अमळनेर : पतंगाच्या मांजाने गळा कापला जाऊन गंभीर जखमी झाल्यामुळे येथील खासगी रुग्णालयात उपचार घेताना रंजाणे येथील महेश पाटील.

या पार्श्वभूमीवर पालकांनी पतंग उडविणाऱ्या मुलांना आवर घातला पाहिजे. तसेच नागरिकांनी देखील रस्त्यावरून जाताना सायकल अथवा मोटारसायकलवरून सावधपणे प्रवास करावा.

दरम्यान, मांजा विक्री करण्यावर बंदी असतानाही हा मांजा नेमका कुठून आला. कारण मांजाची विक्री केल्यास कठोर कायदेशीर कारवाई होऊ शकते. ज्यात दंड आणि गुन्हा दाखल होण्याचा समावेश आहे. कारण मांजा मानवजातासाठी धोकेदायक असल्याने आता शासनाने त्यावर बंदी घातली आहे. त्यामुळे शहरातील मांजा विक्रीच्या दुकानदारांवर पोलीस प्रशासनाकडून कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.





अमळनेर : येथील पालिकेच्या स्वच्छता विभागातर्फे बुधवारी शहरातील विविध भागांत जाऊन प्लास्टिक पिशव्या व इतर वस्तू विक्रीच्या दुकानांची तपासणी करण्यात आली. त्यात सहभागी पालिकेचे स्वच्छता निरीक्षक.

# पालिकेच्या स्वच्छता विभागातर्फे नायलॉन मांजा जप्तीची कारवाई

## तीन विक्रेत्यांकडून दंडापोटी केले पंधरा हजार रुपये वसूल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पालिकेच्या स्वच्छता विभागातर्फे बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी शहरात नायलॉन मांजा जप्ती तसेच प्लास्टिक बंदीसंदर्भात धडक कारवाईची मोहीम राबविण्यात आली. महाराष्ट्र शासन प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात आली.



यात शहरातील विविध भागांत जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून नायलॉन मांजा विक्रेते, प्लास्टिक पिशव्यांची विक्री करणारे दुकानदार यांच्यासह नायलॉन मांजाचा वापर करीत पतंग उडविणारे नागरिक यांच्यावर कारवाई करण्यात आली. यावेळी पालिकेचे स्वच्छता निरीक्षक संतोष माणिक, संतोष जाधव, किरण खंडारे, मुकादम स्वप्नील बिऱ्हाडे, गौतम मोरे, शहर समन्वयक गणेश गढरी, श्याम करंदीकर, अनंत संदानशिव, योगेश पवार, महेंद्र बिऱ्हाडे, भरत आगळे, प्रवीण बिऱ्हाडे, कुंदन सोनवणे, सतीश बिऱ्हाडे, युनूस शेख आदी उपस्थित होते. या कारवाई दरम्यान एकूण २०२ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या. तसेच प्लास्टिक पिशव्या विक्रेते बाबा प्लास्टिक, संजय प्लास्टिक व कोमल भोजनालय यांच्यावर दंडात्मक कारवाई करून त्यांच्याकडून पंधरा हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

# अमळनेर-सोनगीर बस उलटली; सर्व प्रवासी सुखरूप

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथून सोनगीरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील तरवाडे गावाच्या पुढे बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास अमळनेरहून सोनगीरला जाणारी बस (एमएच १४-२३४७) ट्रॅक्टरला ओव्हरटेक करताना उलटली. ट्रॅक्टरला ओव्हरटेक करताना बसचालकाचे नियंत्रण सुटल्याने ही घटना घडल्याचे प्रत्यक्षदर्शींकडून सांगण्यात आले.

या बसमधून अंदाजे १५ प्रवासी प्रवास करत होते. सुदैवाने अपघातात कोणालाही गंभीर अथवा किरकोळ दुखापत झाली नाही. मकर संक्रांती दिनी मोठा अपघात टळल्याने प्रवाशांनी सुटकेचा श्वास घेतला. घटनेची माहिती मिळताच अमळनेर बसस्थानकाचे आगार प्रमुख पी. बी. चौधरी यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

तसेच प्रवाशांची सुरक्षितता व पुढील व्यवस्थेबाबत आवश्यक सूचना दिल्या. अपघातस्थळी तरवाडे येथील नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. बस रस्त्याच्या कडेला जाऊन उलटल्याने काही काळ वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. मात्र संबंधित यंत्रणांच्या मदतीने वाहतूक सुरळीत करण्यात आली. दरम्यान, सर्वच चालकांनी बस चालविताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन आगारप्रमुख चौधरी यांनी केले आहे.




अमळनेर : सोनगीरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील तरवाडे गावाच्या पुढे बुधवारी अमळनेर-सोनगीर बस उलटल्यानंतर त्यातील प्रवाशांना बसमधून बाहेर काढण्याच्या मदतकार्यात व्यस्त बसचालक.

# अबब ! सोन्यात ६,५००, चांदीत ३९ हजारांची वाढ...

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहरातील सुवर्ण बाजारपेठेत गेल्या चार दिवसांपासून सातत्याने तेजीत असलेल्या सोने आणि चांदीच्या दराने बुधवारी आणखी नवीन ऐतिहासिक उच्चांक केला. दोन्ही धातूंचे दर आवाक्याबाहेर गेल्याने ग्राहक अवाक झाले. सुवर्ण व्यावसायिकांनाही मोठा धक्का बसला.

२०२५ मध्ये गुंतवणूकदारांना चांगला परतावा देणाऱ्या सोने आणि चांदीने २०२६ च्या सुरूवातीलाच पुन्हा एकदा तेजीचा वेग पकडला आहे. नवीन वर्षाच्या पहिल्याच



आठवड्यात या मौल्यवान धातूंनी मागील सर्व विक्रम मोडले असून, बाजारात गुंतवणूकदारांचे लक्ष पुन्हा सोन्या-चांदीकडे वळले आहे. आठवड्याच्या तिसऱ्या व्यापार दिवशी बुधवारी चांदीच्या किमतीत तब्बल १५ हजार रुपयांपेक्षा अधिक वाढ नोंदविली गेली. त्याचबरोबर

पान ३ वर




# भारतीय सेना दिन विशेष

# शौर्य, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठेचा गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी १५ जानेवारी हा दिवस भारतात भारतीय सेना दिन म्हणून साजरा केला जातो. देशाच्या सार्वभौमत्वाचे, एकतेचे आणि सुरक्षिततेचे रक्षण करणाऱ्या भारतीय सेनेच्या अदम्य शौर्याला व बलिदानाला हा दिवस समर्पित आहे. १५ जानेवारी १९४९ रोजी फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा यांनी भारतीय सेनेचे पहिले भारतीय सेनापती म्हणून पदभार स्वीकारला, त्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

### भारतीय सेनेचा गौरवशाली इतिहास

भारतीय सेनेचा इतिहास अत्यंत गौरवशाली आणि प्रेरणादायी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातही भारतीय सैनिकांनी आपले शौर्य सिद्ध केले होते. स्वातंत्र्यानंतर देशाच्या सीमांचे संरक्षण, अंतर्गत शांतता राखणे, तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदतकार्य करणे अशा अनेक जबाबदाऱ्या भारतीय सेनेने समर्थपणे पार पाडल्या आहेत. १९४७, १९६५, १९७१ आणि १९९९ (कारगिल युद्ध) या युद्धांमध्ये



भारतीय सेनेने दाखवलेले धैर्य संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

### 'सेवा परमो धर्मः' सेनेचे ब्रीदवाक्य

भारतीय सेनेचे ब्रीदवाक्य 'सेवा परमो धर्मः' हे केवळ शब्द नसून प्रत्येक सैनिकाच्या जीवनाचा आधार आहे. देशसेवेसाठी स्वतःच्या प्राणांची आहुती देण्यास सदैव तयार असलेला भारतीय जवान कठीण हवामान, दुर्गम प्रदेश आणि प्रतिकूल परिस्थितीतही आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडतो.

### आधुनिक भारतीय सेना

आजची भारतीय सेना केवळ संख्येने मोठी नाही, तर तंत्रज्ञानाच्या बाबतीतही अधिक सक्षम होत आहे. आधुनिक शस्त्रसज्जता, प्रगत प्रशिक्षण, डिजिटल प्रणाली आणि स्वदेशी संरक्षण उत्पादनांमुळे भारतीय सेना अधिक बळकट बनत आहे. महिलांचा वाढता सहभाग, युवा अधिकाऱ्यांचे नेतृत्व आणि व्यावसायिक कौशल्यामुळे सेनेचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला आहे.

### सैनिकांचे बलिदान आणि समाजाची जबाबदारी

आपण शांततेत जगतो. कारण सीमांवर आमचे सैनिक अहोरात्र सज्ज असतात. अनेक सैनिकांनी देशासाठी सर्वोच्च बलिदान दिले आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या त्यागाची जाणीव ठेवणे आणि त्यांना सन्मान देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सेना दिनानिमित्त देशभरात परेड, शौर्य प्रदर्शन, श्रद्धांजली कार्यक्रम आणि जनजागृती उपक्रमांचे आयोजन केले जाते.

भारतीय सेना दिन हा केवळ एक उत्सव नसून देशभक्ती, त्याग आणि कर्तव्याची जाणीव करून देणारा दिवस आहे. भारतीय सेनेच्या शौर्याला सलाम करताना आपण सर्वांनी देशाच्या एकतेसाठी, शांततेसाठी आणि प्रगतीसाठी योगदान देण्याचा संकल्प करणे हीच खरी त्यांना मानवंदना ठरेल.

**जय हिंद!**
**जय भारतीय सेना!**

# केदार गरड बनला क्लासवन अधिकारी

## एमपीएससीत राज्यात प्रथम, परिस्थितीवर मात करत यशाला गवसणी!

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्याच्या घडीला सरकारी नोकरी मिळविणे आणि त्यातही अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करणे ही अत्यंत कठीण बाब झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी हजारो पदांसाठी भरती केली जाते, ज्यासाठी लाखो तरुण अहोरात्र मेहनत घेतात. मात्र यश केवळ त्यांनाच मिळते ज्यांच्याकडे दुर्दम्य इच्छाशक्ती आणि संकटांना भेदून जाण्याची जिद्द असते. याचेच एक जीवंत उदाहरण म्हणजे सुर्डी नजीक (ता. माजलगाव, जि. बीड) येथील केदार सुदाम गरड यांनी सादर केले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून येत केदार यांनी एमपीएससी परीक्षेत महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांची ही कामगिरी संपूर्ण राज्यातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### शेती ते सनदी अधिकारी : संघर्षाची गाथा

केदार गरड यांच्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची होती. त्यांचे वडील सार्वजनिक बांधकाम विभागात चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून नोकरीला होते, तर आई घरची शेती सांभाळून दुसऱ्यांच्या शेतावर रोजंदारीला जाऊन संसाराचा गाडा ओढत होती. केदार यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत, तर माध्यमिक शिक्षण सरस्वती विद्यालय, राजेगाव येथे झाले. शिक्षणाची ओढ असूनही कौटुंबिक ओझ्यामुळे त्यांना दहावीनंतर शिक्षणाला पूर्णविराम द्यावा लागला. आईला शेतीकामात मदत करण्यासाठी केदार यांनी सलग चार वर्षे शेतात घाम गाळला. मात्र मोठा भाऊ आळंदीहून शिक्षण पूर्ण करून परतल्यावर केदार यांनी पुन्हा जिद्दीने अभ्यासाकडे वळण्याचा निर्णय घेतला.

### यशाचे सातत्य आणि जिद्द

उच्च शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर गाठल्यानंतर त्यांनी सनदी अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. पहिल्या प्रयत्नात अपयश आले पण त्यांनी हार मानली नाही. वर्ष २०२२ मध्ये त्यांनी पोलीस उपनिरीक्षकपद मिळविले. मात्र त्यांचे ध्येय अजून उच्च होते. पोलीस दलात कर्तव्य बजावत असतानाच त्यांनी अभ्यास सुरू ठेवला आणि १८ ऑगस्ट रोजी लागलेल्या निकालात त्यांनी महाराष्ट्रातून प्रथम येत 'समाजकल्याण सहाय्यक आयुक्त' (वर्ग-अ) पदाला गवसणी घातली.



# चहा करताना चिमूटभर मीठ नक्की घाला

## डॉक्टरांनी सांगितले आश्चर्यकारक परिणाम; पाहून आपणही थक्क व्हाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात चहा हे फक्त एक पेय नाही, तर ती एक दैनंदिन सवय आणि एक खास अनुभूती आहे. सकाळची घाई असो किंवा सायंकाळचा थकवा असो. चहा प्रत्येक वेळी हवा असतो. चहा सामान्यतः पाणी, दूध, चहाची पाने, आले, वेलची किंवा लवंग यांद्वारे बनविला जातो. पण तुम्ही कधी मिठायुक्त चहाबद्दल ऐकले आहे का? हे ऐकायला विचित्र वाटेल. मात्र चहामध्ये चिमूटभर मीठ टाकल्याने त्याचे फायदे वाढू शकतात. त्यामुळे केवळ चव वाढत नाही, तर आरोग्यासाठीदेखील ते फायदेशीर मानले जाते. मिठाचा चहा का फायदेशीर आहे आणि तो कसा बनवायचा ते पाहूया.

### मिठाचा चहा म्हणजे काय?

मिठाचा चहा म्हणजे नियमित दुधाच्या चहामध्ये थोडेसे मीठ, चिमूटभर घालणे. मिठाचा उद्देश चहाला खारट बनवणे नाही, तर त्याचे पौष्टिक मूल्य वाढवणे आणि शरीराला आवश्यक खनिजे प्रदान करणे आहे. योग्य प्रमाणात मीठ घातल्याने चहाचा कडवटपणाही कमी होऊ शकतो.

### मजबूत प्रतिकारशक्तीसाठी उपयुक्त

आजकाल मजबूत रोगप्रतिकारक शक्ती खूप महत्त्वाची आहे. चिमूटभर मीठ घालून चहा प्यायल्याने तुमच्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. मिठातील खनिजे शरीराचे संतुलन राखण्यास मदत करतात, ज्यामुळे किरकोळ आजार टाळता येतात. जर तुम्ही दररोज ही सोपी पद्धत वापरून तयार केलेला चहा प्यायलात, तर शरीरप्रकृती थोड्याफार प्रमाणात सुधारू शकते.

### शरीर हायड्रेटेड ठेवा

मीठ हे एक नैसर्गिक इलेक्ट्रोलाइट आहे. जेव्हा आपल्याला घाम येतो किंवा पाणी कमी होते तेव्हा इलेक्ट्रोलाइट संतुलन बिघडू शकते. मीठयुक्त चहा प्यायल्याने शरीराला आवश्यक इलेक्ट्रोलाइट्स मिळतात, ज्यामुळे हायड्रेशन राखण्यास मदत होते. हा चहा शरीराला पुन्हा ऊर्जा देण्यास मदत करू शकतो, विशेषतः उन्हाळ्यात किंवा जेव्हा तुम्ही थकलेले असता.

### घसा खवखवणे आणि थकवा यापासून आराम

जर तुम्हाला घसा खवखवणे, कोरडेपणा किंवा जडपणा जाणवत असेल, तर मीठयुक्त चहा फायदेशीर ठरू शकतो. मीठ आणि आले एकत्रितपणे घशाला आराम देतात. त्याशिवाय चहाचा उबदारपणा थकवा कमी करण्यास मदत करू शकते.

### त्वचा आतून निरोगी बनवते

मिठामध्ये झिंकसारखे घटक असतात, जे त्वचेच्या आरोग्यासाठी आवश्यक मानले जातात. योग्य प्रमाणात मीठ घातलेला चहा नियमितपणे प्यायल्याने तुमच्या त्वचेचे पोषण होते. त्यामुळे सुरकुत्या, मुरमे व निस्तेजपणा यांसारख्या समस्या कमी होण्यास मदत होते. जर तुम्हाला दीर्घकाळ निरोगी त्वचा राखायची असेल, तर हा एक छोटासा; पण प्रभावी बदल होऊ शकतो.



### ऊर्जा आणि लक्ष केंद्रित करण्यास मदत करते

चहामधील कॅफिन आणि मिठातील खनिजे त्वरित ऊर्जा प्रदान करू शकतात. त्यामुळे मन सतर्क राहते आणि लक्ष केंद्रित होणे सुधारते. सकाळी किंवा दुपारी जेव्हा तुम्हाला आळस वाटत असेल, तेव्हा मीठयुक्त चहा विशेषतः फायदेशीर ठरू शकतो.

### मिठाचा चहा कसा बनवायचा?

मिठाचा चहा बनवणे खूप सोपे आहे आणि त्यासाठी कोणत्याही विशेष घटकांची आवश्यकता नाही. हा चहा तयार करण्यासाठी प्रथम एका पॅन किंवा भांड्यात पाणी उकळवा. त्यात किसलेले आले आणि वेलची घाला. चहाची पाने आणि चवीनुसार साखर घाला. पाणी उकळले की, त्यात दूध घाला. शेवटी, चिमूटभर मीठ घाला आणि चहा उकळू द्या. गॅस बंद करा, चहा गाळून घ्या आणि गरम गरम प्या. थोडेसे मीठ घालावे; अन्यथा चव प्रभावित होऊ शकते.

### कोणी काळजी घ्यावी?

जर तुम्हाला उच्च रक्तदाब, किडनीचा त्रास असेल किंवा तुमच्या डॉक्टरांनी तुम्हाला कमी मीठ खाण्याचा सल्ला दिला असेल, तर मीठयुक्त चहा पिण्यापूर्वी नक्कीच तज्ज्ञांचा सल्ला घ्या. हा चहा रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास, शरीराला हायड्रेट ठेवण्यास, घशातील खवखव कमी करण्यास आणि निरोगी त्वचा राखण्यास मदत करू शकते.

# पतंजलि की चकाचक इलेक्ट्रिक साइकिल ४९९ रुपये में

## एक बार चार्ज में २०० कि.मी. तक की रेंज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अगर आप कम बजट में स्मार्ट और टिकाऊ इलेक्ट्रिक साइकिल की तलाश में हैं, तो पतंजलि की नई इलेक्ट्रिक साइकिल आपके लिए बेहतरीन विकल्प हो सकती है। योग गुरु बाबा रामदेव की अगुवाई में पतंजलि ने इलेक्ट्रिक मोबिलिटी के क्षेत्र में कदम रखा है, और यह नई ई-साइकिल अपनी किफायती कीमत, शानदार रेंज और आधुनिक फीचर्स के कारण चर्चा में है।




### दमदार बैटरी और हाई-एफिशिएंसी मोटर

पतंजलि की इलेक्ट्रिक साइकिल में आधुनिक लिथियम-आयन बैटरी दी गई है, जो एक बार फुल चार्ज पर १००-१२० कि.मी. की दूरी तय कर सकती है। इसके हाई-वर्जन मॉडल १८०-२०० किमी तक की रेंज दे सकते हैं। २५०W से ३५०W की ब्रशलेस मोटर २५ कि.मी./घंटा की टॉप स्पीड प्रदान करती है, जो इसे शहर और गांव दोनों के लिए उपयुक्त बनाती है।

### फास्ट चार्जिंग और लंबी रेंज

इस साइकिल की खासियत इसकी तेज चार्जिंग है। इसे ४-५ घंटे में पूरी तरह चार्ज किया जा सकता है। पोर्टेबल बैटरी को घर या ऑफिस में आसानी से चार्ज किया जा सकता है। इको मोड में यह १०० कि.मी.से अधिक की दूरी तय करती है, जिससे यह रोजमर्रा की यात्रा के लिए किफायती और सुविधाजनक है।

### स्मार्ट टेक्नोलॉजी फीचर्स

पतंजलि की यह साइकिल आधुनिक और स्मार्ट फीचर्स से लैस है.
डिजिटल डिस्प्ले पैनल : बैटरी स्टेटस, स्पीड और ट्रिप डेटा की जानकारी।
एलईडी हेडलाइट और टेललाइट : रात में सुरक्षित राइडिंग के लिए।
जीपीएस ट्रैकिंग सिस्टम : चोरी से बचाव और ट्रैकिंग।
मोबाइल ॲप कनेक्टिविटी : राइड डिटेल्स देखने और लॉक/अनलॉक की सुविधा।
पेडल असिस्ट सिस्टम : कम मेहनत में ज्यादा दूरी।
डिस्क ब्रेक्स : बेहतर ब्रेकिंग और सुरक्षा।

### मजबूत डिजाइन और आरामदायक राइड

इस साइकिल का डिजाइन भारतीय सड़कों और सभी आयु वर्ग के लिए तैयार किया गया है। लाइटवेट मेटल फ्रेम, चौड़े टायर और प्रीमियम सस्पेंशन सिस्टम इसे खराब रास्तों और गांव की पगडंडियों पर भी आरामदायक बनाते हैं।

### सुरक्षा पर विशेष ध्यान

पतंजलि ने सुरक्षा को प्राथमिकता दी है। इसमें शामिल हैं.

- इलेक्ट्रिक हॉर्न और इंडिकेटर सिस्टम।
- स्मार्ट लॉकिंग सिस्टम।
- रियर रिफ्लेक्टर और हेडलाइट्स।
- ऑटो-कट चार्जर, जो बैटरी को ओवरचार्जिंग से बचाता है।

### कीमत और बुकिंग

सोशल मीडिया पर ४९९ रुपये में बुकिंग की खबरें वायरल हैं, लेकिन यह संभवतः केवल बुकिंग राशि है। अनुमानित कीमत ३०,००० रुपये से ४०,००० रुपये के बीच हो सकती है, जो इसे भारत की सबसे किफायती इलेक्ट्रिक साइकिलों में शामिल करती है।

### क्यों चुनें पतंजलि इलेक्ट्रिक साइकिल?

- मेड इन इंडिया प्रोडक्ट।
- पतंजलि ब्रांड का भरोसा।
- लंबी बैटरी लाइफ और फास्ट चार्जिंग।
- स्मार्ट फीचर्स और आकर्षक डिजाइन।
- सभी उम्र के लिए उपयुक्त।

# ही यांची लायकी! 'भारताला सांभाळू शकत नसतील तर आयसीसी बंद करावे'


**पाकिस्तानच्या खेळाडूने का केली मागणी?**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पाकिस्तानच्या माजी फिरकीपटूने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेवर टीका केली आहे. आयसीसी भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड समोर हतबल झाला आहे. अजमलच्या मते जर आयसीसी निष्पक्षपणे निर्णय घेऊ शकत नसेल, तर ती बंद करावी. भारत अनेक वर्षांपासून सुरक्षा कारणांमुळे पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार देत आहे, याच कारणावरून सईद अजमलने आयसीसीवर टीका केली आहे. गेल्या वर्षी आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन पाकिस्तानने केले होते, परंतु भारताने आपले सामने दुबईत खेळले होते.

"आयसीसीने निष्पक्ष निर्णय घ्यावा. प्रामाणिकपणे क्रिकेट व्हावे, मग ते कोणत्याही देशात असो. पाकिस्तान पूर्णपणे सुरक्षित आहे. अनेक संघ पाकिस्तानमध्ये येऊन खेळत आहेत. भारताला काय त्रास आहे की ते येत नाहीत. ते कोणते राजकारण करत आहेत, पाकिस्तानसोबत खेळू इच्छित नाहीत. ठीक आहे, मग आयसीसी बंद करून टाकावी. जर आयसीसी भारताला सांभाळू शकत नसेल, तर मग आयसीसी नाही. जर निष्पक्ष निर्णय घेतला तर त्याचा निकाल तोच असेल जो पाकिस्तान आणि इतर संघ इच्छितात. एका देशावर सर्व संघ चालू शकत नाहीत. सर्वांना समान घेऊन चालावे लागेल", असे सईद अजमल म्हणाला.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शेवटची द्विपक्षीय मालिका २०१२-१३ मध्ये खेळली गेली होती. भारतीय संघाने पाकिस्तानमध्ये शेवटचा सामना २००८ च्या आशिया कप दरम्यान खेळला होता. हे दोन्ही कट्टर प्रतिस्पर्धी संघ केवळ बहुराष्ट्रीय स्पर्धांमध्येच एकमेकांविरुद्ध खेळतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सहभाग आणि प्रसारणाची निश्चितता सुनिश्चित करण्यासाठी क्रिकेट सामने अनेकदा तटस्थ ठिकाणी हलवले जातात. भारत आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ चा सह-यजमान आहे. पाकिस्तान संघ आगामी आयसीसी स्पर्धेत आपले सर्व सामने श्रीलंकेत खेळणार आहे. भारत आणि पाकिस्तान १५ फेब्रुवारी रोजी सामना होणार आहे.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

पान १ वरून ....

## अबब ! सोन्यात ६,५००, चांदीत ३९ हजारांची वाढ...

सोन्याच्या किमतीतही लक्षणीय वाढ झाली असून, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याने नवे उच्चांक गाठले आहेत. या अचानक वाढलेल्या किमतींमुळे सराफा बाजारात मोठी खळबळ पाहायला मिळत आहे. तज्ज्ञांच्या मते सोने आणि चांदीच्या किमतीत झालेल्या या वाढीमागे अनेक जागतिक घटक कारणीभूत आहेत.

**सोने, चांदी आणखी किती महागणार?**

अमेरिका आणि इराणमधील वाढता तणाव, मध्य पूर्वेतील अस्थिर परिस्थिती तसेच जागतिक अर्थव्यवस्थेबाबत असलेली अनिश्चितता याचा थेट परिणाम मौल्यवान धातूंच्या किमतींवर होत आहे. याशिवाय, परदेशी गुंतवणूकदारांकडून होणारी विक्री आणि डॉलरच्या हालचालीही या तेजीला हातभार लावत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. सामान्यतः जेव्हा जागतिक पातळीवर राजकीय किंवा आर्थिक अनिश्चितता वाढते, तेव्हा गुंतवणूकदार सुरक्षित आश्रयस्थान म्हणून सोने आणि चांदीकडे वळतात. सध्याच्या परिस्थितीतही हाच ट्रेंड स्पष्टपणे दिसून येत आहे. शेअर बाजारातील चढ-उतार आणि भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा मौल्यवान धातूंवर विश्वास दाखवला आहे. सुवर्ण व्यावसायिकांच्या मते, जर जागतिक पातळीवरील तणाव कायम राहिल्यास येत्या काळात सोने, चांदीच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**सोन्याचे दर किती वधारले?**

जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत सोमवारी १,८५४ रुपयांची वाढ नोंदविली गेल्याने सोन्याचे दर जीएसटीसह एक लाख ४५ हजार ०२४ रुपयांच्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचले होते. मंगळवारी दिवसभरात पुन्हा २०६ रुपयांची वाढ नोंदविली गेल्याने सोन्याने जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ४५ हजार २३० रुपयांचा सर्वकालीन उच्चांक केला होता. त्यात बुधवारी सकाळी बाजार उघडल्यावर आणखी १,५४५ रुपयांची वाढ नोंदविली गेली. त्यामुळे सोन्याने एक लाख ४६ हजार ७७५ रुपयांचा ऐतिहासिक उच्चांक केला. सोन्यात पाच दिवसांच्या कालावधीत सुमारे ६,४८९ रुपयांची वाढ झाल्याची नोंद घेतली गेली.

**चांदीचे दर किती वधारले?**

जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत सोमवारी १० हजार ३०० रुपयांची वाढ नोंदविली गेल्याने चांदीने जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख ६७ हजार ८०० रुपयांचा सर्वकालीन उच्चांक केला होता. मंगळवारी आणखी ५१५० रुपयांची वाढ नोंदविली गेल्याने चांदीने जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख ७२ हजार ९५० रुपयांचा सर्वकालीन उच्चांक केला होता. त्यात बुधवारी सकाळी पुन्हा तब्बल १५ हजार ४५० रुपयांची वाढ नोंदविली गेली. त्यामुळे चांदीने दोन लाख ८८ हजार ४०० रुपयांचा ऐतिहासिक उच्चांक केला. चांदीत पाच दिवसांच्या कालावधीत सुमारे ३९ हजार १४० रुपयांची वाढ झाल्याची नोंद घेतली गेली.

# भटक्या कुत्र्यांच्या पत्रावरून शिक्षण सचिव अडचणीत

## न्यायालयाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावल्याचा ठपका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवाबाबत काढलेल्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावला. त्यामुळे अनेक शिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांवर शाळा परिसर स्वच्छतेसोबतच भटक्या कुत्र्यांचा वावर कमी करणे, कुत्रा आणि मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी जनजागृती करण्यासाठी प्रत्येक शाळेत मुख्याध्यापकांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी, असे निर्देश दिले. स्थानिक पातळीवर पत्र काढल्याने राज्यभर गोंधळ निर्माण झाला आहे. या प्रकाराबाबत शिक्षण क्षेत्रातून निषेध व्यक्त केला. यावर आता शिक्षण विभागाच्या मंत्र्यांनी थेट शिक्षण विभागाच्या सचिवांना पत्र काढत या प्रकरणी खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने सुमोटोमध्ये दिलेल्या निकालाच्या आधारावर राज्याच्या मुख्य सचिवांनी भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांच्यासाठी जागा निश्चित करणे, असे आदेश राज्यातील सर्व विभागांना दिले होते. त्याच पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागानेही या आदेशाच्या आधारावर भटक्या कुत्र्यांचा शाळेत प्रवेश रोखणे, शाळांचा परिसर यापासून सुरक्षित करणे, कुत्र्यांचा वावर शाळा परिसरात राहणार तसेच उघड्यावर फेकलेल्या खाद्यपदार्थांची योग्य विल्हेवाट लावण्याची खात्री करण्यासाठी नोडल अधिकारी नेमणे, श्वानाचा चावा झाल्यास प्रथमोपचार घेण्यासाठी शाळांत प्रबोधनाचे सत्र आयोजित करणे या सूचना देण्यात आल्या होत्या.

आदेशात कुठेही शिक्षक अथवा मुख्याध्यापकांना कुत्र्यांची संख्या मोजण्याची सूचना अथवा आदेश दिलेले नाहीत. मात्र शिक्षण विभागातील काही अभ्यास कच्चा असलेल्या अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर शाळा आणि परिसरातील कुत्र्यांची संख्या मोजण्यासाठी कॉलम देत यासाठी नोडल अधिकारीच नेमा, अशा सूचना दिल्या.

या सूचनांमागे असलेल्या मूळ आदेशाची खातरजमा न करता काही उत्साही शिक्षक आणि शिक्षक, मुख्याध्यापक संघटनांनी आम्हाला कुत्रे मोजण्याचे आदेश दिल्याचा कांगावा केला. त्यावर शिक्षण क्षेत्रात गोंधळ झाला. यामुळे मूळ आदेशाचा अर्थ समजून न घेणाऱ्या राज्यातील त्या शिक्षणाधिकाऱ्यांची शालेय विभागाकडून तत्काळ माहिती मागविली जाणार आहे. संबंधितांवर कारवाई करण्याची तयारी करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

**शिक्षणाधिकाऱ्यांकडून पत्रक**

शाळा परिसर स्वच्छतेसह भटक्या कुत्र्यांचा वावर कमी करणे, कुत्रा आणि मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी जनजागृती करण्यासाठी प्रत्येक शाळेत नोडल अधिकारी म्हणून शाळा मुख्याध्यापकांची नेमणूक करावी, असे निर्देश शिक्षणाधिकाऱ्यांनी ३१ डिसेंबर २०२५ ला दिले. तसेच याबाबत शाळांना पत्रही दिले.

# सावधान! इन्स्टाग्राम यूजर्ससाठी धोक्याची घंटा

## जगभरातील १७ दशलक्ष इन्स्टाग्राम खात्यांची माहिती लीक...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका सायबर इंटेलिजन्स अहवालानुसार इन्स्टाग्राम, फेसबूक संबंधित वापरकर्त्यांचा डेटा (महत्त्वपूर्ण माहिती) डार्क वेबवर प्रसारित केला जात आहे. जगभरातील १७ दशलक्ष इंस्टाग्राम खात्याची माहिती अशा पद्धतीने लीक झाली आहे, असे हा अहवाल म्हणतो.

याचा अर्थ १७ दशलक्ष वापरकर्त्यांच्या मेल आयडीवरून सायबर ठगांनी त्यांच्या बँकेच्या खात्यांची माहिती मिळविली आहे. अशा परिस्थितीत सध्याच्या समाजमाध्यमांच्या जगात प्रत्येकाचे इन्स्टाग्राम, फेसबूक, एक्स अशा विविध ठिकाणी खाते आहेत. त्यामुळे तुमचे खाते तर फिशिंगच्या जाळ्यात अडकले नाही ना? याची खात्री करा, असा संदेश सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.

याचा अर्थ असा नाही, की प्रत्येक खाते हॅक झाले आहे. परंतु उघड झालेल्या डेटाचा वापर अनेकदा फिशिंग, खाते ताब्यात घेण्याचे प्रयत्न, ओळख फसवणूक आणि सोशल इंजिनिअरिंग हल्ल्यांसाठी केला जात आहे. त्यामुळे समाजमाध्यमांवर सक्रीय असलेल्या प्रत्येकाच्या मनात धास्ती निर्माण झाली आहे.

**कशी होते फिशिंग?**

इन्स्टाग्रामशी जोडलेले ई-मेल आयडी आणि फोन नंबर सायबर गुन्हेगारांकडून मिळविले जातात. वापरकर्ता नावे आणि प्रोफाइल तपशीलचा इतर प्लॅटफॉर्मवरून वापर करत लीक झालेले पासवर्ड पैशांची अफरातफर आणि सेक्स्टॉर्शन फिंगसाठी वापरले जातात. यामुळे लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक होण्याची जोखीम वाढते.

**अशी घ्या काळजी**

तुमचा डेटा लीक झाला असो वा नसो, वापरकर्त्यांनी सावधानता म्हणून ही खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. इन्स्टाग्रामवरून होणाऱ्या गैरवापराचे प्रकार टाळायचे असतील तर वापरकर्त्यांनी त्यांचा पासवर्ड वेळोवेळी बदलला पाहिजे. सोबतच इन्स्टाग्रामशी जोडलेल्या ई-मेल खात्याचा पासवर्डही बदलायला हवा. टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन करताना शक्यतो अधिकृत ॲपद्वारेच ते करावे. थेट आलेले संदेश अर्थात डीएम, ई-मेल किंवा सूक्ष्म संदेशवर मिळालेल्या संशयास्पद लिंक्सवर क्लिक करू नका.

# एकेकाळी ७५ रुपये कमावायचा, आता ४१४ कोटींचा मालक

## अविवाहित बॉलिवूड सेलिब्रिटीकडे ९९ घरे, १०० एकर जमीन अन्...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



मिका सिंग हा बॉलिवूडमधील सर्वांत लोकप्रिय गायक आहे. तसेच मिका खूप श्रीमंत आहे. चित्रपटांसाठी गाणी गाऊन मिका कमाई करतो. पण त्याचबरोबर तो स्टेज शोमधूनही बक्कळ कमावतो. तुम्हाला जाणून आश्चर्य वाटेल. मात्र मिकाकडे १०-२० नव्हे, तर तब्बल ९९ घरे आहेत. स्वतः मिकाने याबद्दल खुलासा केला होता. मिका सिंग आर्थिक नियोजन, योग्य आणि दीर्घकालीन गुंतवणुकीवर विश्वास ठेवतो. मिकाने खुलासा केला, की जेव्हा त्याने त्याच्या करिअरला सुरूवात केली तेव्हा त्याचा पगार फक्त ७५ रुपये होता. पण त्याने कधीही पगार कमी आहे, असा विचार केला नाही. तो गिटार वाजवायचा, गाणी गायचा, जागरण, कीर्तन आणि कव्वालींमध्ये सादरीकरण करायचा. नंतर तो, त्याचा भाऊ दलेर मेहंदीला भेटला. त्यानंतर त्याची परिस्थिती बदलली. मिकाने २०१२ मध्ये एक फ्लॅट खरेदी केला होता. पण ती इमारत कायदेशीर वादात अडकली होती. त्यामुळे तो तेथे राहू शकला नाही. त्याला ती इमारत इतकी आवडली की त्याने त्यात सहा फ्लॅट खरेदी केले होते. नंतर त्याने जवळच्या दुसऱ्या इमारतीत एक फ्लॅट खरेदी केला. तेथे कपिल शर्मा देखील राहतो.

### मिकाजवळ ९९ घरे आणि १०० एकर शेती

मिकाजवळ ९९ घरे आहेत. त्याच्या ९९ व्या घराचे इंटिरियर गौरी खानने केले होते. इतकी घरे का घेतली, असे मिकाला विचारण्यात आले होते. त्यावर लोक सनग्लासेस, दागिने आणि शूजवर खर्च करतात. परंतु तो रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करतो. त्याच्याकडे १०० एकर शेती देखील आहे. ज्यातून १५० कुटुंबांना रोजगार मिळतो, असे मिकाने नमूद केले होते. मिका पुढे म्हणाला, की आम्ही शेतकऱ्यांची मुले आहोत. आम्हाला पैशाचे काय करायचे किंवा कुठे खर्च करायचे हे माहीत नव्हते. आम्हाला फक्त एकच गोष्ट माहीत होती ती म्हणजे जमीन घेणे. कारण आजोबा म्हणायचे, की जमिनीमुळे कधीही तुम्हाला तोटा होता नाही. त्यामुळे घर व जमिनीत गुंतवणूक केली. ४८ वर्षांच्या मिकाने लग्न केलेले नाही. त्यामुळे बायको-मुले नाहीत. इतक्या संपत्तीचे काय होणार, असे प्रश्न लोक विचारत असतात, असे मिकाने एकदा सांगितले होते. दरम्यान, मिका सिंग बॉलिवूडमधील सर्वांत श्रीमंत गायकांपैकी एक आहे. त्याची संपत्ती ४१४ कोटी रुपये आहे, असे म्हटले जाते.

# 'भिकाऱ्याच्या वेशात लपलाय राजा', ५०० गरजूंना वाटले ब्लॅकेट

## नरेंद्र मोदींनीही भिकाऱ्याचे केले होते कौतुक; प्रत्यक्ष व्हिडिओ पाहा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंजाबमधील राजू नावाच्या भिकाऱ्याने भीक मागून जमवलेल्या पैशांतून ५०० गरजू लोकांना ब्लँकेट आणि चहा दिला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होत असून, देशभरातील नेटकरी त्याचे कौतुक करत आहेत.

'हीच आमुची प्रार्थना आणि हेच आमचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे' ही प्रार्थना आपल्यापैकी अनेकांनी ऐकली असेल, तर काहींनी वाचलीही असेल. मात्र एक भिकारी आहे, जो ही प्रार्थना अक्षरशः जगतोय, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण या व्यक्तीकडे ना पोटभर अन्न आहे, ना राहायला घर. तो फुटपाथवर भीक मागून पोट भरतो. पण हा व्यक्ती पैशाने गरीब असला, तरी मनाने मात्र फारच श्रीमंत आहे. कारण भीक मागून जमा



केलेल्या पैशांतून त्याने ५०० गरजू लोकांना उबदार ब्लँकेट वाटली. एवढेच नाही, तर गरमागरम चहा आणि नाश्ताही दिला. स्वतःच्या पोटात अन्नाचा दाणा नसतानाही तो भुकेल्यांना पोटभर खाऊ घालत आहे.

### कोण आहे हा भिकारी?

या भिकाऱ्याचे नाव राजू आहे. तो पंजाबमधील पठाणकोट परिसरात राहतो आणि तेथेच भीक मागून गुजराण करतो. मात्र जेव्हा त्याला गरजवंत दिसतो तेव्हा तो त्याच्या मदतीला धावून जातो. सध्या पठाणकोटमध्ये कडाक्याची थंडी असून गरीब लोकांसाठी प्रत्येक मिनिट कठीण ठरत आहे. हे ओळखून राजूने भीक मागून जमा केलेल्या पैशांतून ५०० ब्लँकेट खरेदी करून त्यांचे वाटप केले. या घटनेचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत असून, देशभरातील नेटकरी त्याचे भरभरून कौतुक करत आहेत. हा व्हिडिओ @Khushi75758998 या एक्स अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. राजू भिकारी यांच्या निःस्वार्थ सेवेची दखल नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमातही घेतली होती. तेव्हा राजूंनी गरिबांसाठी अन्नाची सोय केली होती. राजूसारखी माणसे समाजासाठी आदर्श असल्याचे पंतप्रधानांनी म्हटले होते. आज राजू पुन्हा एकदा चर्चेत असून नेटकरी त्याला 'राजा माणूस' म्हणत आहेत.

**(टीप : या वृत्तात नमूद करण्यात आलेली माहिती ही पूर्णपणे सोशल मीडियावरील पोस्टवर आधारित आहे. त्यामध्ये करण्यात आलेल्या दाव्यांची सत्यता दै. ग्लोबल महातेजने स्वतंत्रपणे पडताळून पाहिलेली नाही.)**

# अजित डोवाल मोबाईल आणि इंटरनेट का वापरत नाहीत?

## राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनी स्वतःच केला उलगडा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोवाल हे त्यांच्या दैनंदिन कामकाजात मोबाईल फोन किंवा इंटरनेटचा वापर करत नाहीत. याबाबत शनिवारी (१० जानेवारी) 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२६' च्या उद्घाटन सत्रात तरुणांशी संवाद साधताना त्यांनी याचा उलगडा केला. भारत मंडपम् येथे आयोजित या कार्यक्रमात प्रश्नोत्तरांच्या सत्रादरम्यान त्यांना विचारण्यात आले, की 'तुम्ही मोबाईल आणि इंटरनेट वापरणे टाळता हे खरे आहे का?' यावर उत्तर देताना माजी गुप्तचर आणि कायदा अंमलबजावणी अधिकारी असलेल्या डोवाल यांनी दुजोरा दिला.

**मी इंटरनेट वापरत नाही हे खरे आहे...**

अजित डोवाल म्हणाले, की मी इंटरनेट वापरत नाही हे खरे आहे. मी फोनचा वापर देखील टाळतो. केवळ कौटुंबिक बाबींसाठी किंवा इतर देशांतील लोकांशी संवाद साधण्यासाठी जेथे अत्यंत आवश्यक असते तिथेच मी फोन वापरतो. मी माझे काम अशाच पद्धतीने व्यवस्थापित करतो. संवादाची इतर अनेक साधने उपलब्ध आहेत आणि काही अतिरिक्त पद्धतींची व्यवस्था करावी लागते, ज्याबद्दल लोकांना माहिती नसते.

**भारताचे 'जेम्स बाँड' अजित डोवाल**

अजित डोवाल हे भारताचे पाचवे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आहेत. केरळ केडरचे सेवानिवृत्त आयपीएस (आयपीएस) अधिकारी असलेल्या डोवाल यांनी अनेक दशके गुप्तचर यंत्रणा, अंतर्गत सुरक्षा आणि दहशतवादविरोधी कारवायांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. १९४५ मध्ये उत्तराखंडमध्ये जन्मलेल्या डोवाल यांनी १९६८ मध्ये पोलीस सेवेत प्रवेश केला. शौर्याबद्दलचा 'कीर्ती चक्र' पुरस्कार मिळवणारे ते सर्वांत तरुण पोलीस अधिकारी ठरले.

**भारतातील बंडखोरीविरोधी मोहिमांमध्ये मोलाची कामगिरी**

अजित डोवाल यांनी मिझोराम, पंजाब आणि ईशान्य भारतातील बंडखोरीविरोधी मोहिमांमध्ये मोलाची कामगिरी बजावली आहे. २०१६ चे सर्जिकल स्ट्राईक आणि २०१९ चे बालाकोट एअरस्ट्राईक यांसारख्या मोठ्या राष्ट्रीय सुरक्षा निर्णयांमध्ये त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण होती. डोकलाममधील पेचप्रसंग हाताळणे आणि भारताची अंतर्गत सुरक्षा धोरणे निश्चित करण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.



### पाकिस्तानमध्ये राहून विशेष कामगिरी

१९९९ मधील 'आयसी-८१४' विमान अपहरण संकटावेळी कंदाहार येथे वाटाघाटी करणाऱ्या पथकात ते सामील होते. १९७१ ते १९९९ या काळात त्यांनी विमानांच्या अपहरणाची अनेक प्रकरणे यशस्वीपणे हाताळली. विशेष म्हणजे त्यांनी अनेक वर्षे पाकिस्तानात 'अंडरकव्हर' (गुप्तवेषात) राहून काम केले आहे. विशेष म्हणजे सोशल मीडियापासून लांब गेल्या वर्षी सरकारने डोवाल यांच्या नावाने फिरत असलेली एक बनावट फेसबुक पोस्ट उघडकीस आणली होती. त्या पोस्टमध्ये पाकिस्तानकडून सायबर हल्ला होणार असल्याचा खोटा इशारा देण्यात आला होता. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने (पीआयबी) स्पष्ट केले होते, की अजित डोवाल यांचे कोणतेही अधिकृत फेसबुक खाते नाही आणि त्यांच्या नावाने पसरत असलेला मजकूर पूर्णपणे बनावट आहे.







# वर्ष २०२६ गुरूंच्या वरदहस्ताचेच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नवे वर्ष २०२६ हे सर्वांवर गुरूंचा वरदहस्त असणारे आहे. त्यामुळे कुठल्याही शंका न घेता सेवेत राहा. मनात कल्प-विकल्प आणू नका. देव झेपेल तितकेच दुःख देतो. नकारात्मक वाचन करू नका. आपण फार साधी माणसे आहोत. आपले काहीही वाईट होत नाही आणि होणारही नाही. प्रचंड ऊर्जा, आशावाद आणि सकारात्मकता यांनी भरलेले हे नवीन वर्ष आपल्या दरवाज्यावर दस्तक देत आहे. त्यामुळे सकारात्मक दृष्टिकोन ठेवत म्हणूया 'अब जो भी होगा सब अच्छाही होगा.'
सद्गुरू कधी आपले वाईट होऊ देतील का? नाही ना. मग झाले तर हाच विश्वास उराशी घेऊन नवीन वर्षात एकमेकांचा हात धरून सेवाकार्य करूया. विश्व प्रार्थना करूया. परमेश्वरा मानवजातीचे, अखंड विश्वाचे, सर्व प्राणीमात्रांचे भले कर. सगळ्यांना बुद्धी दे. नोकरी-व्यवसाय उत्तम चालू राहू दे. आर्थिक विवंचना नको आणि मिळालेल्या लक्ष्मीचा सदुपयोग होऊदे. चांगली बुद्धी प्रदान करण्यासाठी नवीन वर्ष आणि रोजचा दिवस पूजा करताना गणपती स्तोत्र म्हणावे. म्हणजे मन शांत होते आणि दिवसभरासाठी सकारात्मक ऊर्जा मिळते.



जसा विचार कराल तसे होईल. त्यामुळे सोच बदलो. मनातील जर-तर किंतु- परंतु काढून टाका. महाराजांना फक्त भक्ती हवी आहे. ज्याने या अखंड विश्वाची निर्मिती केली तो तुमच्या शिरापुरीवर लाडू-पेढ्यासाठी फिदा होणार नाही. तुमच्या एका साडी-चोळीमुळे प्रसन्न होणार नाही. मनापासून हाक मारून तर बघा. हाकेला 'ओ' नक्कीच येणार. याच विश्वासावर आपल्या भक्तांचा जीवनप्रवास आहे, हे निश्चित. मग वर्ष, दिवस कुठलाही असो.

**स्वामी माझा, मी स्वामींचा!**

नवे वर्ष सर्वांसाठी उत्तम आरोग्य, सद्बुद्धी, आर्थिक स्थैर्य, कौटुंबिक आनंद आणि सोहळे, इच्छा-मनोकामना, संकल्पपूर्तीचे, अधिकाधिक आध्यात्मिकता, भक्तीभाव, सकारात्मकता, समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची बुद्धी या सर्वांनी परिपूर्ण असूदे, हीच महाराजांच्या चरणी प्रार्थना. महाराजांचे असेल मनी ते ते येईल घडोनी, भरवसा त्यांच्या चरणी ठेवून स्वस्थ राहावे. प्रापंचिक जीवनाला अध्यात्माची जोड असेल, तर आहे तेच आयुष्य अधिक उत्तम होईल, यात दुमत नसावे.

**श्री स्वामी समर्थ महाराज की जय...!**


## श्रीपाद श्रीवल्लभ माला मंत्र



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ॐ नमो भगवते श्रीपादप्रभू दत्तात्रेयाय
सहस्त्रकोटी उदिततेजाय अवधुताय
सुमतीनंदनाय नरसिंहसुताय
मातृपितृ पुण्यप्रकटरुपाय आनंदवर्धनाय
बापनाचार्यप्रियाय ॐ गं गणेशस्वरूपाय
द्रां कालाग्नीशमन दत्तस्वरूपाय
हौं महादेव शिवाय कालभैरवाय
श्रीं ह्रिं लक्ष्मी ऐश्वर्यसंपत्कराय व्यंकटेशाय
क्षौं उग्रनृरसिंह भक्तसंरक्षकाय श्रीपादाय
साक्षात् गंधर्वपुरवासाय नृसिंहसरस्वती दत्तात्रेयाय
प्रज्ञापुरवासाय सर्वांतरयामी श्रीस्वामी समर्थ नृहसिंहभान यतीश्वराय
गायत्री सावित्री चैतन्य मंत्रगर्भाय आदित्याय
ॐ दत्त दत्त दत्त श्रीपाद श्रीवल्लभ दिगंबराय
ऐं ह्रिं क्लिं महासरस्वती महालक्ष्मी महाकाली
त्रयरूप अनघाशक्तीपिठाय
वासवीसहित सर्वशक्ती संपन्नाय
जीवशक्ती चैतन्यशक्ती प्रदायकाय
मम सर्व पापराशी ज्वालय ज्वालय
दृष्ट ग्रहान निवारय निवारय
सर्व शत्रूं संहारय संहारय
मनोवांच्छित पुरय पुरय
मम सद्बुद्धी प्रेरकाय द्रां दत्तात्रेयाय
ॐ क्लिं सर्वसुखप्रदाय रक्ष रक्ष रक्षिताय
**श्रीपाद श्रीवल्लभ दिगंबर यतीराजाय नमो नमः**

## दत्त महाराजांना गायन प्रिय



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दत्त महाराजांना गायन फार प्रिय आहे. पण या गायनात वादन समाविष्ट नाही का? तर अवश्य आहे. ज्याला शक्य होईल त्याने वाद्यांचा मेळ अवश्य जमवावा. गायनात एखादे वाद्य सोबत असले, की त्याला लय मिळते आणि गायन बहारीचे होते. दत्त महाराजांच्या काकड आरती ते शेजारतीपर्यंत सर्वत्र या वाद्यांचा उल्लेख आहे.

**ओवाळू आरती माझ्या सद्गुरुनाथा ॥**
**गुरुभक्तांच्या या काकड आरतीत**
**द्वारी चौघडा वाजे वाजंत्री वाजती ।**
**कर्णे वाजंत्री वाजती ॥**

असा वाद्यांचा उल्लेख आहे, तर अपराध क्षमा आता केली पाहिजे. या पदात

**नकळेचि टाळ वीणा वाजला कैसा ॥**

असा वाद्यांचा उल्लेख आहे. आपल्या संस्कृतीत हजारो वर्षे अशी वाद्ये कायम गायनाला साथ देत आहेत. गुरुचरित्रात सहाव्यात रावणाने भगवान महादेवांना प्रसन्न करताना गायन केले तेव्हा त्याने एक वाद्य तयार केले.

कसे तर..

**शिर कापून आपुले देखा ।**
**यंत्र केले करकमळिका ।**
**शिरा काढून तंतुका ।**
**रावणेश्वर गातसे ॥** वाद्ये हा प्रकार फक्त येथे भूमीवरच आहे की देवलोकात देखील वाद्ये वाजवून गायन केले जाते? दत्त महात्म्यात ब्रह्मलोकात झालेल्या उत्सवाचे वर्णन आहे. (हे वर्णन सात गाथेतील एक गाथेत आले आहे.) या गाथेत गंधर्व गायन करत असताना सोबत झालेल्या वादनाचे वर्णन आहे.

**कशी वाद्ये होती त्यात?**

मृदूंगादि आनद्ध वाद्ये -- म्हणजे चामड्याचे आच्छादन असलेली वाद्ये. वीणादिक तंतुवाद्ये, मुरलीप्रमुख सुषिर वाद्ये अर्थात छिद्र असलेली वाद्ये आणि घनवाद्ये अर्थात अशी वाद्ये जी एकदुसऱ्यावर आपटून ध्वनी उत्पन्न करतात. उदा.- झांजा, चिपळ्या वगैरे. दत्त माहात्म्यात देवलोकातील जसा या वाद्यांचा उल्लेख आहे तसाच पाताळ लोकातील नागांनी हि वाद्ये कशी वापरली याचा उल्लेख आहे . अलर्क आख्यानात मदालसेला पुन्हा प्राप्त करायला अश्वतर आणि कंबल हे दोन नाग कैलास प्रांतात गेले . हेतू हा कि भगवान महादेवांना प्रसन्न करावे आणि त्यांच्या वरदानाने पुन्हा मदालसेला प्राप्त करावे . या वेळी या नाग द्वयाने आधी सरस्वतीला प्रसन्न करून गायन कला प्राप्त केली आणि या गायन कलेने भगवान महादेवांना प्रसन्न करावे म्हणून ते कैलास प्रांतात आले . भगवान महादेवांना प्रसन्न करताना त्यांनी केलेल्या गायनाबरोबर वाद्ये वाजवून मेळ जमवल्याचा उल्लेख आहे . दत्त महाराजांना गायन प्रिय आहे आणि त्या गायनात वाद्याने लय जरी प्राप्त होत असली तरी नेहेमी हे कसे करावे ? आधी एखादे वाद्य घेऊन ते वाजवायला शिकणे आणि त्याचा गायनाबरोबरीने उपयोग करणे हे जरी उत्तम असले तरी नेहेमी वाद्य बाळगणे शक्य असतेच असे नाही . पण मग अशा वेळी काय करावे ? अहो टाळी नाही का वाजवता येत ? आरत्या म्हणताना आपण या हातांचाच तर वाद्य म्हणून उपयोग करतो. महाराज नित्य भावाला महत्त्व देतात हे जाणून गायन, वादन अवश्य करा.

**श्री गुरुदेव दत्त!!!**

## श्री गुरुचरित्राची महती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रपंच करताना सर्वसाधारणपणे आपले म्हणणे असते, की आयुष्य तर गेले आहे. आपल्या मुलाबाळांचे आयुष्य सुखात जावो म्हणून आपण धावपळ करत असतो. आपणास आपल्यापेक्षा मुलाबाळांची जास्त काळजी असते. यावरच श्री गुरुचरित्र या ग्रंथातील अठराव्या अध्यायात खूप गोड वर्णन आले आहे. श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज, अमरापूर येथील गरीब विप्राच्या घरी दुपारी भिक्षेसाठी जातात. तो विप्रा भिक्षा मागून आपल्या कुटुंबाचे उदरभरण करत असे. भिक्षा मिळाली नाही तर दारात असणाऱ्या घेवड्याच्या शेंगांची भाजी बनवून त्या दिवसाचे उदरभरण करत असे. यती महाराज घरी आल्यावर त्यांची भक्तीभावाने पूजा करून घेवड्याच्या शेंगांची भिक्षा दिली. स्वामी महाराजांनी भिक्षा घेऊन निघताना त्या विप्राला आशीर्वाद दिला. भिक्षा करून ब्राह्मणास/आश्वासिती संतोषे/ गेले तुझे दरिद्र दोष/म्हणून निघतील तये वेळी आणि जाताना दारातील घेवड्याची वेळ मुळासकट उपटून टाकली आणि महाराज संगमावर गेले. यावेळी त्या विप्राची पत्नी शोक करू लागली की आपले काय चुकले, ज्यामुळे यतीरायाने आपला घास उपटून टाकला. अशा प्रकारे ती दुःख करू लागली. यावेळी तो विप्रा आपल्या पत्नीला समजावून सांगत आहे.

म्हणे स्त्रियेसी तिये वेळी/ जे जे होणार जया काळी/निर्वाण करी चंद्रमौळी/तया आधीन विश्व जाणे//
विश्वव्यापक नारायण /उत्पत्तीस्तिथीलया कारणे /पिपिलिकादी स्थूळ जीवन /समस्था आहार पुरवितसे //
चौर्यायेंशी लक्ष जीवनासी /स्थूळ सूक्ष्म परीयेसी /निर्माण केले आहारासी /मग उत्पती तदनंतरे//


चौऱ्याअंशी लक्ष योनी जीवाला आधी भगवंताने अन्न निर्माण केले आहे. मगच उत्पत्ती केली आहे. आपण भविष्याची काळजी करायची गरज नाही. आताचा क्षण आपल्या हातात आहे तो त्याच्या नामात घालवणे योग्य ठरेल. या प्रकारे तो ब्राह्मण आपल्या पत्नीला समजावत आहे. तो वेल मुळासकट उपटून टाकताना त्याच्या मुळाजवळ सोन्याचा हंडा त्यांना सापडतो. मग ते आनंदात नवल करत स्वामींचे गुणगाण करत दर्शनासाठी संगमावर जातात.
ज्यासी होय गुरुची कृपा/ त्यासी कैचे दैन्य बापा / कल्पवृक्ष आश्रय करी तापा / दैन्य कैचे तया घरी //
असे हे श्री गुरुचरित्र एकदा पारायण केले, की परत परत करावेसे वाटते.

# स्वामींची पूजा गुरुवारी कशी करावी?

## निश्चित स्वामीकृपा होईल, आयुष्यातील अडचणी दूर होतील!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री स्वामी समर्थ महाराज यांची लीला अगाध आहे. स्वामींच्या केवळ नामस्मरणाने मनाला धीर मिळतो. आयुष्यात सकारात्मकता येते, हे अनेक स्वामीभक्तांनी अनुभवले असेल. स्वामींची सेवा करण्याची सर्व भक्तांना ओढ असते. काहींना सेवा कशी करावी व कुठून सुरू करावी हे माहीत नसते. त्यातच गुरुवारी स्वामींची सेवा करण्याचे विशेष महत्त्व असल्याने या दिवशी स्वामींना प्रसन्न करण्यासाठी कशी पूजा करावी. ते जाणून घेऊया.




### स्वामी सदैव भक्तांच्या पाठी

स्वामी नेहमी म्हणतात, 'तू भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे'. त्याचप्रमाणे स्वामी सदैव त्यांच्या भक्तांच्या पाठी संकटकाळी उभे राहतात. स्वामीसेवेत इतकी ताकद आहे, की अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी देखील स्वामींच्या केवळ नामस्मरणाने शक्य होताना दिसतात. स्वामींच्या सेवेत नक्की करायचे काय? कोणत्या प्रकारची पूजा स्वामींची केली जाते? स्वामी कोणत्या गोष्टीमुळे प्रसन्न होतात? असे अनेक प्रश्न काही जणांच्या मनात येतात. ज्या लोकांना स्वामीसेवेची सुरूवात करायची आहे त्यांच्यासाठी पाहूया स्वामींची गुरुवारची पूजा कशी करावी? नित्यसेवा कशी करायला हवी? कोणत्या गोष्टी स्वामीसेवेत करू नये?

### नित्य स्वामीसेवा कशी करावी?

स्वामींची सेवा म्हणजे काय तर स्वामींची मनोभावे करण्यात येणारी नित्य पूजा होय. स्वामीभक्त या पूजेला स्वामींची सेवा करणे म्हणतात. यासाठी दररोज सकाळी लवकर उठून स्नान झाल्यानंतर आपल्या घरातील देवघरात स्वामींची पूजा करावी. स्वामींच्या मूर्तीला किंवा फोटोला स्वच्छ करून गंध लावावा. फूलहार, फूल स्वामींना वाहावे. धूप, दीप, अगरबत्ती लावल्यानंतर नमस्कार करावा. नित्य सेवेत स्वामींचा रोज नियमित नामजप करू शकता. यामध्ये रोज किमान १ ते ११ माळा 'श्री स्वामी समर्थ' या मंत्राचा जप करावा. याशिवाय रोज तारकमंत्र म्हणून शकता. स्वामी चरित्र सारामृत या ग्रंथातील रोज एक अध्याय याप्रमाणे पठण करू शकता. थोडक्यात काय तर स्वामींची पूजा आपल्या क्षमतेप्रमाणे मात्र मनोभावे करावी. हा नित्यक्रम सुरू ठेवल्यास स्वामी प्रसन्न होतात, अशी मान्यता आहे.

### गुरुवारची पूजा कशी करावी?


गुरुवारी आपण नित्य सेवा तर करावीच. मात्र या दिवशी स्वामींच्या मठात जरूर जावे. स्वामींना नमस्कार करून चाफ्याचे फूल वाहावे. बेसनाचे लाडू स्वामींना आवडत असल्याने एखाद्या गुरुवारी प्रसाद म्हणून स्वामींना लाडू नैवेद्यात देऊ शकता. तसेच या दिवशी तारकमंत्र आणि स्वामींच्या नामाची जपमाळ जरूर करावी. स्वामींशी आपल्या मनातील इच्छा अगदी आपल्या आईशी बोलल्याप्रमाणे मनमोकळ्या पद्धतीने बोलाव्यात. स्वामी नक्की ऐकतात. आपल्यासाठी जे योग्य आहे ते स्वामी आपल्याला अवश्य देतात. फक्त पूर्ण विश्वास आणि समर्पणाने गुरुवारची सेवा करावी.

### स्वामीसेवेत कोणत्या गोष्टी टाळाव्यात?

आपल्याला माहिती आहे, की स्वामींनी अक्कलकोटमध्ये असताना अनेक भक्तांना मार्ग दाखविला. त्यांनी कधीच आपल्या लीलांचे अवडंबर केले नाही. त्याचप्रमाणे भक्तांनी देखील आपल्या भक्तीचे प्रदर्शन न करता साधेपणाने पूर्ण भावाने भक्ती करावी. याशिवाय स्वामीसेवा करताना आपले मन आणि विचार शुद्ध असावेत. कोणाबद्दलही कटकारस्थान करू नये, कोणाचे वाईट चिंतू नये. विश्वासाने भक्ती करावी. आचरण आपले योग्य असावे. नेहमी सत्मार्गावर चालावे. दानधर्म करावे. गोरगरिबांना, पशूंना अन्नधान्य दान करावे. या गोष्टी जर आपण आचरणात आणल्या तर स्वामी नक्की प्रसन्न होतील. कारण भक्तीसोबतच स्वामी आपले कर्म देखील पाहतात आणि प्रत्येकाचा कर्माचा हिशेब स्वामी करतात. त्यामुळे कर्म चांगले ठेवा. स्वामी सेवा तर स्वीकारतीलच पण कृपा देखील करतील.

# मकर संक्रांतीला एकादशी आल्यास तांदळाची खिचडी खावी का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



यंदा मकर संक्रांती १४ जानेवारी अर्थात बुधवारी आलेली आहे. याच दिवशी एकादशी तिथीचा देखील शुभ संयोग बनलेला आहे. मकर संक्रांतीला दान करण्याची पद्धत आहे. मात्र एकादशीला कोणत्याही प्रकारचे दान करणे निषिद्ध मानले जाते. यामुळे लोकांमध्ये थोडा संभ्रम असतो. या दिवशी खिचडीचे दान करावे की नाही?

मकर संक्रांतीचा सण धार्मिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा मानला जातो. मकर संक्रांतीच्या दिवशी सुवासिनी महिला ओवसा करतात. देवाची पूजा करतात. तसेच सूर्यदेवाला अर्घ्य देऊन दिवसाची सुरूवात करतात. यंदाची मकर संक्रांत एकादशी तिथीला आल्याने खास होती. एकादशीचा उपवास सुद्धा मकर संक्रांतीला करतात. मात्र एकादशीच्या दिवशी दान करणे शास्त्रात निषिद्ध मानले गेले असल्याने मकर संक्रांतीच्या पावन दिनी खिचडीचे दान करता येणार नाही, असा प्रश्न अनेकांच्या मनात असतो. दान करावे की नाही? करायचे असल्यास तांदळाची खिचडी दान करावी का? कारण एकादशीला तांदूळ खाल्ले जात नाहीत. या सर्व प्रश्नांची उत्तरे आपण जाणून घेऊया.

सूर्य धनू राशीतून निघून मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा मकर संक्रांतीचा सण साजरा केला जातो. या दिवशी सूर्य आपला पुत्र शनीच्या राशीत म्हणजेच मकर राशीत प्रवेश करतो. या दिवसापासून सूर्य उत्तरायण होतो आणि देवांचा दिवसही सुरू होतो. श्रीमद्भगवद् गीतेमध्येही मकर संक्रांतीच्या दिवसाला मोठे महत्त्व सांगितले आहे. या दिवसापासून देवलोकात दिवसाची सुरूवात होते आणि सूर्यदेव आपल्या वरदानानुसार मकर राशीत येऊन धन, समृद्धी आणि सुख घेऊन येतात. म्हणूनच या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. तसेच परंपरेनुसार मकर संक्रांतीच्या दिवशी खिचडीचा नैवेद्य दाखविला जातो. खिचडी तसेच तांदळाचे दानही केले जाते. परंतु यावर्षी मकर संक्रांतीसोबत षटतीला एकादशीचा संयोग आल्यामुळे भाविकांत संभ्रमाची स्थिती निर्माण झाली.

शास्त्रानुसार एकादशी तिथीला अन्न सेवन करणे आणि अन्नदान करणे निषिद्ध मानले जाते. विशेषतः तांदूळ खाणे आणि दान करणे टाळले जाते. अशा परिस्थितीत मकर संक्रांतीला आपण तीळ, गूळ आणि शेंगदाणे यांसारख्या वस्तूंचे दान करू शकता. तांदूळ आणि खिचडीचे इतर साहित्य दान करण्यासाठी बाजूला काढून घरातील मंदिरात ठेवू शकता.

### एकादशीला खिचडी वर्जित मग कधी करावे दान?

यंदा मकर संक्रांती १४ जानेवारी अर्थात बुधवारी आली. त्यानंतर १५ जानेवारी रोजी गुरुवार आहे. शास्त्रानुसार गुरुवारच्या दिवशी खिचडीचे सेवन करणे वर्जित मानले जाते. त्यामुळे जर तुम्ही त्या दिवशी खिचडी बनवू शकत नसाल तर तुम्ही शनिवारी म्हणजेच १७ जानेवारी रोजी खिचडी बनवू शकता आणि याच दिवशी तुम्ही तांदळाचे दानही करू शकता. विशेष म्हणजे १७ जानेवारी रोजी शनिवार असून, या दिवशी सप्तमी तिथीनंतर अष्टमी तिथी असेल जी शनीशी संबंधित आहे. जोपर्यंत सूर्य मकर राशीत गोचर करत राहील तोपर्यंत दान-पुण्याचे शुभ योग कायम राहतील. त्यामुळे या दिवशी आपण जे काही तांदळासारखे दान कराल त्याचे आपल्याला उत्तम फळ मिळेल. १७ जानेवारी रोजी खिचडीचे सेवन करणेही शुभ राहील आणि आपल्या ग्रहांचे दोषही दूर होतील.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)